# उज्ज्वल कृषी संपदा २००८

संपादक - अनिल महात्मे



- नैसर्गिक संत्रा
- पपई
- मोसंबी
- कागदी लिंब
- मिरची
- टोमॅटो
- भाजीपाला लागवड
- निर्यात
- धान
- कापूस
- बीटी
- पिठ्या ढेकूण
- बटाटा
- हळद
- सेंद्रिय शेती
- **सोयाबीन**








३० रु.

# फळबागेच्या अवघड गणिताचं सोपं उत्तर

# जैन ठिबक®



बेभरवशाच्या पावसामुळं, पाण्याअभावी
संत्रा आणि अन् मोसंबीच्या बागा
करपून जाण्याचं गणित
'जैन ठिबक' आल्यापासून पार बदललंय!
लोडशेडिंगचं वेळापत्रक सांभाळून,
योग्य मात्रेनं पाणी देण्यात 'जैन ठिबक' चा हातखंडा!

नेमस्त पाणीपुरठ्यानं झाडं
तरतरीत अन् फळं टवटवीत!
सोबत जैन व्हेन्च्यूरीनं खताच्या मात्रा थेट मूळापाशी!
म्हणजेच निरोगी, सशक्त, तजेलदार
अन् रसरशीत फळासाठी
'जैन ठिबक' सर्वोत्तम.

संत्री, मोसंबी आणि लिंबूवर्गीय
फळांसाठी ठिबक खरेदी करतांना
शेतकरी 'जैन ठिबक' मध्ये
अधिक 'रस' घेतात
ते उगाच नव्हे !






जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी... ब्रह्मांडाचा भेद करी®


जैन प्लास्टीक पार्क, पो.बॉ. ७२, जळगांव - ४२५००१. फोन: ०२५७-२२५८०११; फॅक्स्: ०२५७-२२५८१११; ई-मेल: jisl@jains.com; वेबसाईट: www.jains.com

कार्यालय: अहमदनगर ९४२२७७१००५; अमतरावती ९४२२२९२१०३; औरंगाबाद ९४२२७७४९१२; पुणे: ९४२२२८३४२९ बारामती ९४२२७७४९३५; लातूर ९४२२७७३३८९; मुंबई ०२२-२२१२९०९०; नांदेड ९४२२७७३३८९; नाशिक ९४२२७७४९१६; नागपूर ९४२२२८३४०८; पंढरपुर ९४२२७७३३९०; रत्नागिरी ९४२२७७४९१३; सांगली ९४२२२९२१०८; सोलापुर ९४२२७७३३९०; ठाणे ९४२२७७४९१९.

अथवा आजच नजीकच्या जैन ठिबक वितरकांशी संपर्क साधा.

जैन पाईप | जैन ठिबक | जैन पीई पाईप | जैन स्प्रिंकलर | जैन टिश्यूकल्चर | जैन सौरबंब | Chapin | API | PEPCO | NAANDANJAIN

# भवरलालजी जैन यांचा पद्मश्री पुरस्काराने गौरव



राष्ट्रपती भवन दिल्ली येथील अशोका हॉलमध्ये भारत सरकारद्वारे दिले जाणारे प्रतिष्ठेचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. ११९ जणांपैकी पहिल्या टप्प्यात ६१ जणांना सन्मानित करण्यात आले. यात प्रामुख्याने सुप्रसिध्द गायिका आशा भोसले, प्रणव मुखर्जी, एव्हरेस्टवीर एडमंड हिलेरी (मरणोत्तर), 'इन्फोसिसचे' एन.आर. नारायणमूर्ती, पी.एस.आर. ओबेराय, सचिन तेंडूलकर यांच्यासह जळगाव येथील 'जैन इरिगेशन'चे संचालक **डी.आर. मेहता** आणि 'जैन इरिगेशन'चे संस्थापक अध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत **भवरलालजी जैन** यांचा समावेश आहे. भाऊंच्या रूपाने पद्मश्री मिळविणारे जळगाव जिल्ह्याचे ते पहिलेच व्यक्ती आहेत. जैन इरिगेशन आणि उद्योगासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जैन इरिगेशनच्या संचालक मंडळातील दोन संचालक पहिल्यांदाच एकाचवेळी पद्म पुरस्काराचा स्वीकार करीत आहेत.

ज्येष्ठ विचारवंत आणि जैन उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांना केंद्र सरकारतर्फे 'विज्ञान आणि अभियांत्रिकी'तील आपल्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल 'पद्मश्री' देण्यात आली.

'... हा पुरस्कार शेतकऱ्यांच्या जीवनस्तरात सुधारणा, पाण्याची बचत आणि उत्पादन वाढ, नाशवंत शेतमालाचे मूल्यवर्धन अशा समाजसेवेच्या भावनेने जैन उद्योग समूहाने वाटचाल केली आहे. आपल्या देशाच्या संस्कृतीचा शेती हा कणा आहे. मात्र अलीकडे तो कमी होत आहे. कोरडवाहू शेतीची बागायती कशी होईल यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. भविष्यात आता शिक्षण आणि कोरडवाहू शेतीची बागायती कशी होईल यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. भविष्यात आता शिक्षण आणि कोरडवाहू शेती या दोन क्षेत्रात अभूतपूर्व कार्य करायचे आहे...' अशी प्रतिक्रिया भवरलालजी जैन यांनी व्यक्त केली.

ठिबक सिंचन, फलोत्पादन, उतीसंवर्धन, फळ प्रक्रिया उद्योगाद्वारे कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणणाऱ्या संपूर्ण जिल्ह्यासोबतच भाऊंना आदराचे स्थान आहे. शेती व शेतकऱ्यांविषयी आयुष्यभर चिंतन, मनन आणि प्रत्यक्ष कृतीद्वारे कार्य करणारे भाऊ हे स्वतः भूमिपुत्र आहेत. कृषी व कृषी आधारित उद्योग विश्वात नवनवीन विक्रम स्थापन केले आहे. जेआयएसएलला आतापर्यंत निर्यात क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी, संशोधन व विकास क्षेत्रातील यश आणि उद्योजकता, फेअर ट्रेड प्रक्टिस यासारख्या विविध कारणांसाठी ३४ राज्य पुरस्कार, ११३ राष्ट्रीय पुरस्कार आणि ४ आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. "क्रॉफर्ड रीड मेमोरियल" हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील अत्यंत मानाचा पुरस्कार इरिगेशन असोसिएशन सिंचन क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी" करता देण्यात आला. इतकेच नव्हे तर २००६ मध्ये त्यांनी विविध विद्यापीठांच्या डॉक्टरेट पदव्यांची हॅटट्रीक साधली. प्रथम उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लेटर्स देऊन गौरविले. नंतर डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीने डीएस्सी देऊन गौरव केला तर राजस्थानच्या महाराणा-प्रताप शेती व तंत्रज्ञान विद्यापीठ उदयपूर यांनी डीएस्सी पदवीने अलंकृत केले आहे. साहित्य, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्राच्या पाठीशी 'जैन चॅरिटीज'च्या माध्यमातून भाऊ व त्यांचे चार मुलं खंबीर उभे आहेत.

या भाऊंसह जैन परिवारातील चार पिढ्यांची म्हणजेच काका दलूभाऊ जैन, भाऊ कांतिलालजी जैन, मुलगा अशोक जैन आणि नातू अथांग जैन, स्नुषा सौ. ज्योती जैन, डॉ. सुभाष चौधरी, केळी तज्ज्ञ के.बी. पाटील यांचीही उपस्थिती होती.

□□